# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

क्र:मविनिआ/माअअ/72/2018/ 307

दि.02.11.2018

प्रति,
श्री. दामोदर पारिक,
नवजीवन कॉलनी, मु.पो. ता. वैजापूर,
जिल्हा- औरंगाबाद- ४२३ ७०१

**विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.**

महोदय,

आपला दिनांक १०.१०.२०१८ रोजीचा अर्ज माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) अन्वये आयोगाच्या कार्यालयास दि. १६.१०.२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No. | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| 1 | विद्युत ग्राहक गाऱ्हाणी निवारण मंचावर (CGRF) ग्राहक प्रतिनिधी सदस्य (CPO)ची निवड प्रक्रिया ही कायद्यातील तरतूदीप्रमाणे विद्युत नियामक आयोगाने पार पाडावी की, विद्युत कंपनीने या संदर्भातील माहिती देण्यात यावी. | विद्युत ग्राहक गाऱ्हाणी निवारण मंचावर (CGRF) ग्राहक प्रतिनिधी सदस्य (CPO) ची निवड प्रक्रिया ही महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम, २००६ अन्वये विनियम ४ नुसार केली जाते. सदर विनिमयात सुधारणा २ एप्रिल, २००७ रोजी करण्यात आली आहे. |

आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाच्या www.merc.gov.in OR www.mercindia.org.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेली आहे. जर आपणांस माहितीच्या छायांकित प्रती हव्या असल्यास माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार पुढीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची छायांकित प्रतीची एकूण पृष्ठे | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकूण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| ३७ | २ | ७४/- | अंदाजे रु. २००/- | २७४/- |
| | | | एकूण रु. | २७४/- |

वरीलप्रमाणे आकारलेले शुल्क आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष रोख रक्कम जमा करुन शुल्क भरल्याची पावती/ चलन पुरावा सत्य प्रत या कार्यालयात समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्यावेत.

आयोगाच्या कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी श्री. अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई हे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम १९ (१) अन्वये सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी